## सत्र काळातील कामकाजाचा आढावा

**अध्यक्ष** : आता मी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा घेत आहे. विधानसभेचे सोमवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ पासून मुंबई येथे सुरू झालेले अर्थसंकल्पीय अधिवेशन आज गुरूवार, दिनांक २८ फेबुवारी, २०१९ रोजी संस्थगित होत आहे.

या सभागृहाच्या बैठकांची एकूण संख्या ०४ असून प्रत्यक्षात १३ तास २० मिनिटे कामकाज झालेले आहे. कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी १ तास ३० मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज ३ तास ३० मिनिटे झालेले आहे.

या अधिवेशनात विधानसभेने एकूण ५ विधेयके संमत केली.

नियम ९७ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या १३ आहे.

सन २०१९-२०२० चा अंतरिम अर्थसंकल्प सभागृहाला सादर करण्यात आला.

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपाध्यक्ष, माननीय संसदीय कार्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्षनेते, सर्व माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिद्धी माध्यमांचे प्रतिनिधी, विधिमंडळाचे अधिकारी व सर्व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मनापासून आभार मानतो. मंत्रालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे देखील मी या ठिकाणी आवर्जून आभार मानतो.

आता मी पुढील अधिवेशनासंबंधीची घोषणा व हे अधिवेशन संस्थगित करण्याबाबत माननीय राज्यपालांकडून आलेला संदेश वाचून दाखवितो.

--------